**मे. आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज सहकारी साखर कारखाना लि., हरळी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य यांचे सध्याची ऊस गाळप क्षमता २००० टन प्रतिदिन पासून ५५०० टन प्रतिदिन करणे आणि सी / बी हेवी मोलॅसिस /ऊसाचा रस / एकवटलेलो ऊसाचा रस आधिरित २५ केएलपीडी ते २०० केएलपीडी आसवणी विस्तारण क्षमता, २०० केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरीट / इ.एन.ये./ इथेनॉल उत्पादन या तीन प्रस्तावित प्रकल्पांच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त.**

---

मे. आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज सहकारी साखर कारखाना लि., हरळी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य यांचे सध्याची ऊस गाळप क्षमता २००० टन प्रतिदिन पासून ५५०० टन प्रतिदिन करणे आणि सी / बी ग्रेड हेवी मोलॅसिस / ऊसाचा रस / एकवटलेला ऊसाचा रस आधिरित २५ केएलपीडी ते २०० केएलपीडी आसवणी विस्तारण क्षमता, २०० केएलपीडी रेक्टीफाईड स्पिरीट / इ.एन.अे./ इथेनॉल उत्पादन या प्रस्तावित प्रकल्पांची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे **दि.०९-०८-२०२३** रोजी सकाळी ११.३० वाजता मे. **आप्पासाहेब नलवडे गडहिंग्लज** सहकारी साखर कारखाना लि., हरळी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथे कारखाना कार्यस्थळावर आयोजित करण्यात आली. **पर्यावरण विषयक** जाहीर जनसुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते :-

१. मा. श्री. संजय तेली, - अध्यक्ष
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा
निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर,
(मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी)

२. श्री. ज. शं. साळुंखे, - सदस्य
प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि. मंडळ, कोल्हापूर
(म.प्र.नि. मंडळाचे प्रतिनिधी)

३. श्री. प्रमोद रा. माने,
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, - संयोजक
कोल्हापूर.

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त पुढील प्रमाणे :-

सर्वप्रथम श्री. प्रमोद रा. माने, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे संयोजक यांनी मा. श्री. संजय तेली, अपर जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. ज. शं. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले.

समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली. जेनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या मान्यतेने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी सांगीतले की, कारखाना व्यवस्थापनाने प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील प्रभाव मुल्यांकन विभागाकडे (Impact Assessment Division) प्रस्ताव सादर केलेला होता त्या अनुषंगाने पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांनी दि. २३.०३.३०२३ रोजी टी. ओ. आर. मंजूर केला आहे त्याचा एक भाग म्हणून जनसुनावणी घेण्यात येत आहे व त्याची पर्यावरण आघात मुल्यांकन नोटीफिकेशन २००६ तथा तदनंतरच्या सुधारीत नोटीफिकेशननुसार दि. ०६.०७.२०२३ रोजी स्थानिक मराठी भाषेत पुढारी व इंग्रजीमध्ये टाईम्स ऑफ इंडिया या स्थानिक वर्तमान प्रत्रामध्ये सूचना प्रसारीत केलेल्या होत्या. तसेच नोटीफिकेशन नुसार डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट च्या प्रति मा. जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर; महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र कोल्हापूर; मा. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर; पर्यावरण व हवामान बदल विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई; महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय, मुंबई व प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर; उप विभागीय अधिकारी कार्यालय, गडहिंग्लज, तहसिलदार, तहसिल कार्यालय, गडहिंग्लज, गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गडहिंग्लज, ग्रामसेवक, ग्राम पंचायत हरळी खुर्द व हरळी बुद्रुक या ठिकाणी प्रकल्पाबाबतची सर्व माहिती एक महिन्यापुर्वी जनतेच्या वाचनासाठी ठेवलेल्या होत्या. त्याचा अभ्यास करुन जर कोणाला आक्षेप, टिका टिप्पणी करायची असेल तर त्यासाठी एक महिना कालावधी देण्यात आलेला होता. या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावीत आज सर्व प्रथम प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक सल्लागार माहिती सादर करतील ते शांतपणे एकूण प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपल्या शंका, प्रश्न टिका टिप्पणी आपले नाव व गाव सांगून उपस्थित कराव्यात व त्याचे उत्तर पर्यावरण विषयक सल्लागार यांनी द्यावीत, तसेच आपली लेखी निवेदने आमच्याकडे द्यावीत तसेच आपले म्हणणे सुध्दा मांडू शकता या सर्वाची नोंद घेवून त्याचे इतिवृत्त शासनाकडे जसेच्या तसे सादर केले जाणार आहे. प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती निर्णय घेत नाही, अंतीम निर्णय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय घेणार आहे.

या नंतर मा. श्री. संजय तेली, अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की, या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीमध्ये जी चर्चा होईल त्याची जशीच्या तशी नोंद घेवून आम्ही इतिवृत्त शासनाकडे सादर करणार आहे कोणताही निर्णय घेणार नाही, त्याबाबतचा निर्णय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय घेणार आहे. त्यापुढे त्यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार माहिती देतील त्यानंतर आपण आपल्या तक्रारी, सूचना, हरकत मांडावी तसेच लेखी निवेदन स्विकारले जाईल. यानंतर मा. अध्यक्षांनी प्रस्तावित प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी माहिती सादर करण्याची विनंती केली.

यानंतर कारखान्याचे तांत्रिक सल्लागार श्री. डॉ. सुब्बाराव, मे. डॉ. सुब्बाराव एन्व्हायरनमेंट सेंटर, सांगली यांच्यावतीने प्रस्तावित प्रकल्पाबाबत स्लाईड शो व्दारे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये प्रकल्पाची प्रस्तावना, प्रकल्पाचे वर्णन, प्रकल्पाचे स्थान, सामान्य स्थान दर्शविणारा नकाशा, विशिष्ट स्थान आणि प्रकल्प सिमा दर्शविणारा नकाशा, प्रकल्पाचा ले आऊट प्लॅन, स्त्रोत आवश्यकता आणि पायाभूत सुविधा, आवश्यक वीज, पाण्याची आवश्यकता, कारखान्याची पाण्याची आवश्यकता व सांडपाणी निर्मिती, साखर विभाग सांडपाणी प्रक्रिया, साखर विभाग कन्डेन्सेट प्रक्रिया, आसवणी विभाग कन्डेन्सेट प्रक्रिया, घरगुती सांडपाणी प्रक्रिया, आसवणी विभाग सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा, हवा उत्सर्जन व्यवस्थापन, विद्यमान तसेच प्रस्तावित केलेल्या बॉयलर आणि त्यातील हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेसाठी लावण्यात येणा-या उपकरणांचा तपशील, घनकचरा व्यवस्थापन, घातक कचरा, हवा पर्यावरण, प्रस्तावित क्रिया प्रक्रियामुळे हवेच्या गुणवत्तेवर होणारा प्रभाव, पीएम १०, पीएम २.५, एसओ२, एनओएक्स, इ. बाबत वाढीव प्रमाणासाठी प्रमाण विशेष आकृती, जल विश्लेषण व परिणाम, अभ्यासाच्या क्षेत्राच्या १० किमी परिघात मातीच्या विश्लेषणाचा अहवाल, ध्वनी वातावरण, अभ्यास क्षेत्रातील जमिनीचा वापर, कारखान्याची छायाचित्रे, कारखान्यातील हरितपटटा दर्शविणारी छायाचित्रे, पर्यावरण व्यवस्थापन योजनेच्या दिशेने अर्थसंकल्पात तरतूद, सामुदायिक पर्यावरण उत्तरदायित्व योजना, रेनवॉटर आणि स्टॉर्मवॉटर संवर्धन योजना, निष्कर्ष इ. बाबत माहिती सादर केली. सादरीकरणाची छायांकित प्रत सोबत सहपत्र १ म्हणून जोडत आहे.

वरील सादरीकरणानंतर पर्यावरण विषयक जाही जनसुनावणीचे अध्यक्ष श्री. संजय तेली यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत जर प्रश्न, आक्षेप, शंका असतील तर त्या आपले नाव व गाव यांचा उल्लेख करुन मांडाव्यात तसेच सी.एस.आर. / सामाजिक उत्तरदायीत्व याबाबत प्रकल्प प्रवर्तकाने ज्या सात बाबी सादर केल्या होत्या याबाबत आपल्या अपेक्षा नमूद करु शकता असे सांगितले. यानंतर खालीलप्रमाणे प्रश्नोत्तरे झाली.

**प्रश्न क्र. १. श्री. काशिनाथ कल्लाप्पा माने, राहणार चन्नेकुप्पी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

कामगारांना प्रस्तावित प्रकल्प मान्य आहे.

**प्रश्न क्र. २. श्री. अमर चंद्रशेखर झोंड, राहणार गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

प्रस्तावित प्रकल्प हरळी गावांपासून जवळ आहे, पहिली आग्रहाची सूचना अशी आहे की हरळी खुर्द आणि हरळी बुद्रक गावांना पाणी पुरवठा आहे त्या साठयाची क्षमता अगोदर वाढली पाहिजे, आताच्या घडीला पाण्याचे नमुने घेतले पाहिजेत, पाण्यामध्ये दुषीतपणा आढळता कामा नये, प्रस्तावित प्रकल्पाची क्षमता वाढली याचा अर्थ प्रकल्पास लागणारे पाणी या परिसरातून मोठया प्रमाणात घेतले जाणार आहे, त्यांनी सांगितल्याप्रमाणे क्षमता निर्माण व्हायला वेळ लागणार आहे तोपर्यंत आताचा जो गावांसाठी पाणी साठा आहे तो कमी होता कामा नये, तसेच जवळच्या हिरण्यकेशी नदीमध्ये कारखान्यातून प्रक्रिया केलेले सांडपाणी थेट मिसळता कामा नये, कामगारांना प्रोटेक्टीव साधने द्यावीत, कारखान्याच्या प्रक्रिया यंत्रणेतून नायट्रोजन डाय ऑक्साईड सारखे निर्माण होणारे गॅस शरीराला घातक आहेत त्यामुळे कामगारांना गॅस पासून संरक्षणासाठी मास्क असलाच पाहिजे, कामगार उच्च तापमानामध्ये काम करतात त्यामुळे त्याप्रमाणे त्यांना संरक्षण साधने मिळाली पाहिजेत, सदरील प्रस्तावित प्रकल्प चांगला असून त्याचे आम्हाला कौतूक वाटते, ज्यांनी प्रस्तावित प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे त्यांचे कौतूक करुन अभिनंदन करतो, मात्र सुरक्षीततेची काळजी घ्या व प्रकल्प यशस्वी करा.

उत्तर -

यावेळी डॉ. बी. सुब्बाराव, प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक तांत्रीक सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या सांडपाण्यावर तीन प्रकारे प्रक्रिया केली जाणार आहे असे सांगितले.

यामध्ये साखर कारखान्याच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते शुध्द करुन त्याचा पुर्नवापर (रिसायक्लींग) करण्यात येणार असल्याचे सांगितले. यापुढे त्यांनी कन्डेनसेट पॉलीशींग युनीट मधील वाफेचे पाणी एकत्रीत करुन त्यावर प्रक्रिया करुन ते रिसायक्लींग करणार आहे, तसेच आसवणी प्रकल्पातील सांडपाणी घट्ट करुन त्याचे ड्रायरव्दारे खत पावडर तयार करणार असे सांगून प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास कोणत्याही प्रकारचे बाहेरचे अधिक पाणी घेणार नसल्याचे सांगितले. तसेच कारखाना प्रक्रियेमधून निर्माण होणारे सांडपाण्यावर संपूर्ण प्रक्रिया करुन ते कारखान्यासाठी वापरणार असल्यामुळे सद्यस्थितीमध्ये गावांसाठी असणारा पाणी साठा कमी होईल अशी काळजी करण्याचे कारण नाही.

**प्रश्न क्र. ३. प्राध्यापक श्री. पी. डी. पाटील, कारखाना सभासद, राहणार हरळी बुद्रुक, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

मी गेली अनेक वर्षे बघतो मा. कै. श्री. बाबासाहेब कुपेकर व सध्याचे महाराष्ट्र राज्याचे मा. मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांच्या प्रयत्नामुळे या भागामध्ये उत्कृष्ट पाण्याची व्यवस्था झालेली आहे. बारमाही पाणी असल्याने ऊस क्षेत्र वाढले आहे, त्यामुळे या कारखान्याला एकूण २० किमी क्षेत्रामधून ऊस येतो त्यापेक्षा लांबून ऊस आणावा लागत नाही. तरीसुध्दा दुर्देवाने या कारखान्याची क्षमता वाढविली गेली नाही तसा प्रयत्न केला गेला नाही. यावेळी तसा प्रयत्न होत आहे त्यामुळे मी कारखाना व्यवस्थापनाचे व अधिका-यांचे अभिनंदन करतो. कारखान्याची क्षमता वाढविली नाही तर भविष्यातील कारखान्याचा खर्च आणि कामगारांचा पगार, शेतक-यांची बिले देऊ शकणार नाही त्यामुळे कारखान्याची क्षमता वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच कारखान्याचे बाय प्रॉडक्टसुध्दा वाढविले पाहिजे व प्रस्तावित इथेनॉल प्रकल्प कारखान्याच्या भवितव्याच्या दृष्टीकोनातून प्रगतीशील बाब आहे. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पास सर्वांनी मान्यता द्यावी असे मला वाटते. दुसरे म्हणजे आपला डिस्टलरीचा प्रकल्प बरेच वर्षे चालू आहे पण त्यातून निर्माण होणा-या स्पिरीटचे प्रमाण अत्यंत कमी होते त्यामुळे डिस्टीलरीची क्षमता सुध्दा वाढवावी अशी माझी कारखाना व्यवस्थापनाला विनंती आहे व सर्वांना विश्वासात घेऊन कारखान्याचे भविष्य व शेतक-यांना जास्तीत जास्त दर कसा देता येईल, कामगारांची देणी कशी देता येईल त्यांना पगार, बोनस कसा देता येईल या दृष्टीने विचार करुन कारखान्याची क्षमता वाढवली जावी अशी विनंती केली.

**प्रश्न क्र. ४. श्री. शशिकांत बाबुराव चौगुले, ग्रामपंचायत सदस्य, हरळी खुर्द, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

कारखाना हरळी खुर्द व हरळी बुद्रुक या गावचा असल्याने सर्वाधिक अडचणी या गावांनाच आहेत, कारखान्याच्या मळीचे साठवण ज्याठिकाणी केली जाते तेथे ३५ घरे आहेत, त्यामुळे सदरील मळी स्टोरेजमुळे निर्माण होणारा वास व पावसाळयात सदरील पाणी घरात जाते त्यामुळे लहान मुले व वृध्द लोकांना त्याचा त्रास होतो, त्याचे नियोजन व्हावे. त्यापुढे त्यांनी सांगितले सदर प्रकल्प व्हावा कारण हा पूर्ण तालुक्याचा प्रकल्प आहे त्यामुळे त्यास कसलाही विरोध नाही, प्रकल्प चांगला व्हावा पण लहान मुले व वृध्द यांच्या तब्येतीची काळजी घेतली जावी, मळी व मळी मिश्रीत पाण्यामुळे ३५ घरे पूर्ण दुषीत व बाधीत झाली आहेत. दुसरा प्रश्न आहे की, प्रस्तावित प्रकल्पामुळे जी धुळ जाणार आहे त्यातून कार्बन निघणार नाही असे सांगतात, पण २०११ मध्ये मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास पत्र दिले आहे त्या तक्रारीचे निवारण व्हावे, परंतु त्याचे २०२३ पर्यंत अजून निवारण झालेले नाही ते नुसते कागदावरच होवू नये ही आमच्या ग्रामस्थांच्या वतीने विनंती आहे. आता जर त्याचे निवारण झाले नाही तरी आजुबाजुच्या गावांना त्याचा फार त्रास होणार आहे. तिसरी गोष्ट, कारखान्यातून निर्माण होणा-या उग्र वासाचा त्रास होतो, जाणारे पाणी अंडर ग्राऊंड व बंदीस्त करावे, दुषीत पाण्याचा वास येतो तो वास बंद करावा अशी ग्रामस्थांची मागणी आहे. चौथा महत्वाचा विषय कारखान्याचे मळीमिश्रीत पाणी पावसाळयामध्ये किंवा कारखाना चालू असताना ओढया नाल्यांमधून नदीत जाते व तेच पाणी हरळी व गडहिंग्लज येथील जॅकवेलमध्ये मिक्स होते आणि तेच पाणी आम्ही पित आहोत, त्यामुळे आजाराचे प्रमाण वाढत आहे, त्याचे प्रमाण कमी व्हावे व कारखान्याच्या खालच्या बाजुला सात शेतकरी आहेत दरवर्षी आम्ही त्यांच्या नुकसान भरपाईसाठी अर्ज करतो, जर तुम्ही खाली बघीतला तर सर्व शेतक-यांच्या शेतात मळीमिश्रीत पाणी जाऊन शेतक-यांचे फार नुकसान होते ते कमी होण्याचा प्रयत्न करावा आणि सर्वांनी मिळून प्रकल्प चांगला चालवावा आणि तालुक्याचे वैभव जपावे. वरील गोष्टीकडे लक्ष देऊन, तुम्ही आम्हाला मदत करुन या विषयावर चर्चा व्हावी.

**उत्तर** –

प्रकल्प सल्लागार डॉ. बी. सुब्बाराव यांनी सांगितले की, संपूर्ण प्रकल्प जिरो लिक्वीड डिसचार्ज करणार आहेत म्हणजे कुठहेही पाणी आसवणी असो किंवा साखर कारखाना असो त्यामधून निर्माण होणारे कुठलेही पाणी बाहेर जाणार नाही व ते अजीबात बाहेर जाऊ दिले जाणार नाही. त्यासाठी या प्रकल्पामध्ये आम्ही जवळ जवळ २५ कोटी रुपये खर्च करणार आहे. हे पाणी शुध्दीकरण करुन संपूर्ण रिसायकल करणार आहे. पुर्वी मळी चाळीस दिवस, साठ दिवस, नव्वद दिवस अशी साठवली जायची पण आज सात दिवस साठवणार त्यामुळे कुठलाही वास, धोका असल्याचे आपल्याला दिसून येणार नाही.

**प्रश्न क्र. ५. श्री. राहुल सुभाष शिरकोळे, राहणार मुगळी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पासाठी कारखान्याचे चेअरमन, व्हाईस चेअरमन संचालक मंडळ यांचे मी सर्वप्रथम अभिनंदन करतो कारण या कारखान्याला भौगोलिकदृष्टया २० ते २५ किमी क्षेत्रातून ऊस जातो, आधी २५ टक्के ऊस लागवडीचे क्षेत्र होते, आता ८० ते ९० टक्के क्षेत्र ऊसाचे आहे आणि कारखाना २००० टनाचा असल्यामुळे सर्वाधिक त्रास शेतक-यांना होत होता, त्यामुळे ऊस वेळेत जाण्यासाठी विस्तारीकरण ही काळाची गरज आहे, आजुबाजुचे व इतर तालुक्यातील कारखाने ५००० ते ८००० टनावर चालू आहे, विस्तारीकरण व इथेनॉल प्रकल्प पाहिजेच आहे, हरळी गावच्या लोकांना जर काही त्रास होत असेल, आता सर्व टेक्नॉलॉजी नवी आहे, लोकांना मळीचा त्रास होणार नाही, मोठ मोठे इक्वीपमेंट व तंत्रज्ञान वापरले जाणार आहे त्यामुळे पर्यावरणाचा —हास होणार नाही. प्रस्तावित विस्तारीकरण काळाची गरज आहे व ते व्हावे.

**प्रश्न क्र. ६. श्री. अमर कल्लाप्पा कांबळे, राहणार हरळी बुद्रुक, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

हा साखर कारखाना हरळी बुद्रुक व हरळी खुर्द या दोन्ही गावांमध्ये आहे. प्रस्तावित प्रकल्पाबददल प्रथम मी आमच्या गावातर्फे संचालक मंडळाचे आभार मानतो. माझा मुददा आहे की, आमच्या गावातून जे सांडपाणी जाते त्याचे पूर्णपणे विल्हेवाट लावावी, धुर/राखेची विल्हेवाट व्यवस्थित लावावी, ते केल्यास प्रस्तावित प्रकल्पाबाबत आमची कोणतीही हरकत नाही.

**प्रश्न क्र. ७. श्री. अमर रामचंद्र चव्हाण, राहणार चन्नेकुप्पी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

मी संचालक मंडळाचे मनापासून आभार मानतो की आपण चांगल्याप्रकारची संकल्पना डोळयासमोर ठेवली आहे. हरळीच्या लोकांनी जो प्रश्न उपस्थित केलेला त्याचे अधिका-यांनी उत्तर देण्याचे काम केलेले आहे, सन १९७८ कारखाना स्थापना झाली त्यावेळी अशाच प्रकारच्या कार्यक्रमाचे अवलोकन झाले असेल. पण त्यानंतर लोकांना होणारा त्रास या गोष्टी बघीतल्या तर एकीकडे उद्योग वाढल्याशिवाय विकास होत नाही, त्याचबरोबर चालू उद्योगाचा जनतेला कोणत्या पध्दतीचा धोका होऊ शकतो काय, जनतेला जीवन जगताना ज्या गोष्टी लागत असतात मिळणार काय व त्या शाश्वत टिकण्यासाठी काय करावे लागणार याबाबत माझी महाराष्ट्र प्रदूषण नियंतण मंडळाला विनंती असेल. श्री. चौगुले यांनी सांगितले की, आम्ही तुम्हाला २०११ साली निवेदन दिले होते त्यावर गेल्या १२ – १३ वर्षात म.प्र.नि. मंडळाने त्यावर काय केले हाही विचार डोळयासमोर ठेवावा लागेल. मी या साखर कारखान्याचा संचालक म्हणून काम केलेले आहे. मी ज्यावेळी पाच वर्षे येथे काम करत होतो त्यावेळी सातत्याने हरळी गावचे लोक येत होते आणि त्यांच्या घरामध्ये कारखान्याची राख येते असे म्हणायचे, सांगण्याचे तात्पर्य असे आहे की, ज्यांनी भोगले आहे त्यांनाच कळते, माझी म.प्र.नि. मंडळास एवढीच विनंती आहे की, हरळी गावाच्या लोकांनी ज्या सूचना मांडल्या आहेत त्यांना विश्वासात घेऊन ज्या गोष्टींची गरज आहे ते करावे. तसेच मगाशी कारखान्याच्या अधिका-यांनी सांगितले की, या साखर कारखान्याची जमीन ५४ हेक्टर आहे, हरळीच्या लोकांनी निवेदनात म्हंटले आहे की इथेनॉल प्रकल्प हा आमच्या रस्त्यालगत आहे. माझे म्हणणे आहे की लोकांची सोय होऊन तो प्रकल्प येथे झाला पाहिजे त्याचबरोबर लोकांना त्याचा कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही, प्रकल्पाची जागेचे नियोजन बदलून ५४ हेक्टर जमीनीवर इतरत्र करावा ज्याचा हरळीच्या लोकांना त्रास होणार नाही. मगाशी सांगण्यात आले यामध्ये सध्याचे राजकारण सुध्दा येते शेतकरी म्हणायचे माझ्या शेतात स्पेंट वॉशचे पाणी घुसले म्हणून ऊसाचा शेंडा करपला, शेंडे सर्वांचेच करपतात पण जो येतो त्याला पैसे मिळतात व न येणा-याला मिळत नाही. प्रस्तावित प्रकल्पासाठी सर्व संचालक मंडळाचे मनापासून आभार, कारण २० किमी क्षेत्रातील १० ते १२ लाख टन ऊसाचे गाळप आहे. प्रस्तावित प्रकल्प झालाच पाहिजे तो होण्यासाठी आपण लागेल ती मदत करुया पण ज्या गावच्या लोकांनी जमीनी दिल्या, दान

दिले आहे त्या लोकांना त्रास न होता हा प्रकल्प व्हावा व त्या गावातील लोकांना विश्वासात घेऊन काम करावे असे माझे मत असेल. सर्वात महत्वाचा मुददा आहे की, गडहिंग्लज तालुक्यातील हिरण्यकेशी नदी आहे येथील लोकांना इचलकरंजीतील लोकांसारखी पंचंगगा नदीचे पाणी प्रदूषीत असल्यामुळे पाणीची भिक मागण्याची वेळ येऊ नये, आमची नदी प्रदूषणमुक्त राहील असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावे पहावे.

**प्रश्न क्र. ८. श्री. रामचंद्र धोंडीबा पोवार, राहणार कौलगे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

गेल्या वेळी मी कारखान्याच्या आवारात आलो होतो कारखान्याचा परिसर व आतील बाजू बघीतल्यानंतर परिस्थिती अत्यंत दयनीय वाटली, आज सकाळी ११ वाजता मी या आवारात आलो व फिरुन आलो तेव्हा कारखान्याचे धुराडे पेटणार अशी आशा मला वाटू लागली आहे त्यामुळे कारखान्याच्या संचालक मंडळाचे अभिनंदन. आपण सांगितले की, या जनसुनावणीची नोंद घेवून जशीच्या तशी शासनाकडे पाठवणार आहात असे सांगण्यात आले, माझी अशी विनंती आहे पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीचा अभिप्राय जर द्यायचा असेल तर सकारात्मक अभिप्राय देऊन या कारखान्याचे विस्तारीकरण व्हावे अशी आपल्याला विनंती आहे आणि हरळी गावांच्या लोकांना त्रास नुकसान होत असेल तर नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन या कारखान्याचे विस्तारीकरण व्हावे अशी कळकळीची विनंती.

**प्रश्न क्र. ९. सौ. साधना आयवाळे, सरपंच, हरळी खुर्द, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

प्रकल्पांतर्गत सामुदायिक पर्यावरण उत्तरदायित्व योजना यामध्ये जो काही खर्च केला जाणार आहे त्यामध्ये सात मुददे आहेत यामध्ये मुददा क्र. ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच वैद्यकीय शिबिरे, जवळच्या गावांना सौर ऊर्जा यामध्ये जो काही खर्च आहे तो केला जावा अशी विनंती आहे. या भागातील शालेय, कॉलेजचे विद्यार्थी यांना आपल्या प्रकल्पांर्तगत फायदा व्हावा हे मी सांगू इच्छिते, आणि प्रस्तावित प्रकल्पामुळे दोन्ही गावांना चांगलाच फायदा होणार आहे, तालुक्याचे नाव होणार आहे, त्यासाठी संचालक मंडळाचे अभिनंदन करते.

त्यावर पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष मा.संजय तेली यांनी सांगितले की, सी.एस.आर. अंतर्गत जो साडेसहा ते सात कोटी रुपये खर्च होणार त्यातील या दोन गावांचे

योगदान लक्षात घेता त्या गावांना अधिकाधीक खर्च करावा अशी समितीची सूचना राहील तसेच पाणी, वीज, शाळांमधील क्लासरुम बांधणे, मुलांना शैक्षणिक उपकरणे याबाबत जास्तीतजास्त खर्च करावा अशी सूचना केली.

**प्रश्न क्र. १०. श्री. आनंदराव धोंडीबा पोवार, राहणार इंचनाळ, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.**

कारखाना सुरु करण्यासाठी दोन बाबी महत्वाच्या असतात भरपूर ऊस व ऊसासाठी पाणी पाहिजे, या कारखान्याच्या २० किमी परिसरामध्ये भरपूर ऊस आहे, कै. बाबासाहेब कुपेकरांनी पाणी दिले आहे. प्रस्तावित प्रकल्प होणे ही काळाची गरज आहे ते झालेच पाहिजे त्याशिवाय कारखाना फायद्यात येणार नाही, सभासदांना पैसे मिळतील, देणी घेणी आहेत, परवा आपण कारखान्याच्या कामगाराबाबत जो निर्णय घेतला त्याबददल सर्व संचालक मंडळ व अध्यक्ष यांची तालुक्यामध्ये प्रशंसा होत आहे चांगला निर्णय घेतलेला आहे तसेच १९७८ पासून येथे कामगार प्रामाणिकपणे त्यांची देणी घेणी त्यांना विश्वासात घेऊन पैसे द्यावे. प्रस्तावित प्रकल्पासाठी आपणांस सर्व कामगारांचा पाठींबा आहे.

यानंतर डॉ. प्रकाश श्रीपादराव शहापुरकर, अध्यक्ष, मे. आप्पासो नलवडे गडहिंग्लज तालुका स.सा.का. लि., हरळी यांनी सांगितले की, सन २००३-०४ पासून कुठल्याही बँकेने आपल्या कारखान्याने कर्ज दिले नाही, आता ज्या हरकती मांडल्या त्यासर्व गोष्टी गृहीत धरुन नियोजन चालू आहे, पर्यावरण विषयक सल्लागारांनी माहिती देताना पाण्याची आवश्यकता ११८७ केएलपीडी आहे असे सांगितले, पण १९९८-९९ मध्ये जो के.टी. वेअर बांधला तो भविष्यात २५०० केएलपीडी कारखान्याची सोय व्हावी यासाठी केली त्यामुळे पाणी कमी पडणार नाही, नवीन तंत्रज्ञान म.प्र.नि. मंडळाच्या नियमापमाणे पर्यावरण परवाना घेणे सक्तीचे आहे पण मी पुर्वी चेअरमन असताना बॉयलर राखेपासून दोन्ही हरळी गावांतील प्रदूषण रोखण्यासाठी फलाय ॲश अरेस्टर बसवून राखेचे प्रमाण ९९ टक्के कमी केले होते, हरळी गावाला प्रथम मी पिण्याचे पाणी दिले, आज मला पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीला सांगायचे आहे की, ही डिस्टीलरी मे. प्राज इंडस्ट्री यांनी उभी केलेली महाराष्ट्रातील पाहिली डिस्टीलरी आहे त्यामुळे टेक्नॉलॉजी जुनी होती. आज महाराष्ट्रामध्ये अशी टेक्नॉलॉजीवर चालणारी डिस्टीलरी नाही, ही टेक्नॉलॉजी मी इथेनॉल प्रकल्पामध्ये संपूर्णतया बदलत आहे, इथेनॉल प्रकल्पामुळे स्पेंट वॉश कमी निर्माण होईल, ड्रायर टेक्नॉलॉजी वापरुन

डिस्टीलरीचे सांडपाणी प्रक्रिया करणार आहे, पार्टीकल्स वेगळे करुन बायोगॅस, मिथेन वेगळे करुन कारखान्यासाठी वापरले जाईल, उर्वरीत पाणी ड्रायर मध्ये वापरुन ८० ते ८५ टक्के पोटॅश खत तयार होईल ते सभासदांना दिले जाईल. त्यामुळे मी कारखान्याचा अध्यक्ष म्हणून आपणाला १०० टक्के खात्री देतो आपल्याला १०० टक्के शुध्द पाणी शुध्द हवा देण्याची जबाबदारी माझी आहे. मी कारखान्याचा अध्यक्ष असताना पाच वर्षामध्ये सरासरी ३,७५,००० टन ऊसाचे गाळप झाले आहे. तसेच, कारखान्यासाठी वसंतदादा इन्स्टीटयूट कडून मी मान्यता मिळवली. आपल्या भागामध्ये एकमेव डीस्टीलरी आहे ज्यास बायो कंपोस्टींगची परवानगी आहे त्यामुळे कुठल्याही सांडपाण्याचा त्रास होणार नाही, आज इथेनॉल उत्पादन ही सर्व साखर उद्योगाची लाईफ लाईन आहे त्यामुळे क्षमता वाढविणे व इथेनॉल निर्मिती ही काळाची गरज आहे, कारखान्याला वीस वर्षानंतर आर्थीक मदत मिळाली आहे, प्रदूषण होणार नाही, सभासदांना विनंती आहे की रिकवरी चांगली होण्यासाठी चांगला ऊस द्यावा, अर्ध कच्चा ऊस देऊ नये.

वरील बाबत जनसुनावणीस हजर असलेल्या काही व्यक्तींनी उपस्थित अधिका-यांच्याकडे अर्ज दिले तसेच जनसुनावणीपूर्वी फक्त ०२ निवेदने प्राप्त झाली होती जी हरळी बु.॥ व हरळी, खुर्द या ग्रामपंचायतीने टपालाव्दारे व ई-मेल व्दारे यांनी दिली होती त्याबाबत त्यांनी जनसुनावणीच्या वेळी सदरहु मुददे उपस्थितांसमोर मांडले.

यानंतर श्री. प्रमोद रा. माने, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा संयोजक यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पामध्ये नवीन तंत्रज्ञान वापरणार आहे व प्रदूषण कमी होईल या अटीवरच गाळप क्षमता वाढविण्याची परवानगी दिली जाते, स्टेट एन्वायरनमेंटल समिती अटी घालूनच परवानगी देते, अटी नुसार चालू नसेल तर कारवाई केली जाते तसेच जनतेकडून आलेल्या प्रश्नांचे लवकरात लवकर निवार म.प्र.नि. मंडळाकडून केले जाईल.

यानंतर श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य यांनी सांगितले की, प्रगती काळाची गरज आहे, आपण चांगले मुददे मांडले आहेत, मुख्य मुददा असा आहे की, पाण्याचे स्त्रोत अबाधीत राहीले पाहिजेत, हवा प्रदूषणाचा त्रास कमी झाले पाहिजे, प्रस्तावित प्रकल्पामध्ये नवीन तंत्रज्ञान आणणार आहे त्याप्रमाणे प्रक्रिया झाली पाहिजे. जे पोटॅश तयार होणार आहे ते सर्व सभासदांना योग्य व माफक दरात देणे आवश्यक आहे, माती परीक्षण झाले पाहिजे, नवीन ऊस बियाणे तंत्रज्ञान याबाबत शेतक-यांना सांगितले

पाहिजे तसेच सी.एस.आर. रकमेचा उपयोग झाला पाहिजे, हे सर्व केल्यानंतर कारखान्याची प्रगती होणार आहे.

शेवटी मा. श्री. संजय तेली, अध्यक्ष तथा निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कारखाना परिसरातील नागरीकांनी मोठया प्रमाणात उपस्थित राहून उत्सफुर्त मते मांडून प्रश्न उपस्थित केले जनसुनावणी शांततेत पार पाडण्यास सहकार्य केले, आणखी लेखी निवेदने द्यायची असतील तर द्यावीत असे असे सांगून उपस्थितांचे आभार मानले व जन सुनावणी संपल्याचे जाहीर केले.

प्रस्तावित प्रकल्पाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांची प्रती सोबत जोडलेल्या आहेत.

(प्रमोद रा. माने)
संयोजक
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर

(ज. शं. साळुंखे)
सदस्य
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर

(संजय तेली)
अध्यक्ष
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा
निवासी उप जिल्हाधिकारी, कोल्हापूर